जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 21 जुलै 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 22 जुलै 2020.
6. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. ताकृअ/तंत्र/कॅम्प/2020 दि. 27 जुलै 2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/मह/नै.आ.1/कावि-415 दि. 24 जुलै 2020.

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दिनांक:- 27/07/2020.

विषय:- कोरोना 19 विषाणुमुळे उध्दभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता दिनांक 25/07/2020 रोजीच्या 00.00 वाजेपासुन दिनांक 01/08/2020 रोजीच्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व मुरुम नगर पालिका क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या कालावधीत कृषी सेवा केंद्रे व बँकांचे कामकाज चालू ठेवण्यास परवानगी देणेबाबत.

आदेश :-

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी कोरोना विषाणू कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 4 व 5 अन्वये दिनांक 25/07/2020 च्या 00.00 वाजेपासुन ते 01/08/2020 च्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व मुरुम नगर पालिका क्षेत्रात संचारबंदी लागु करण्यात आली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद यांनी असे कळविले आहे की, तालुका कृषी अधिकारी, उमरगा यांनी दि. 26.07.2020 रोजी उमरगा तालुक्यात क्षेत्रीय पाहणी केलेली आहे. तालुक्यात मूग, उडीद, सोयाबीन व मका पिकाची पिक परिस्थिती चांगली असून मुग व उडीद पिकावर मावा व करपा रोगाचा, मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा व सोयाबीन पिकावर पाने खाणा-या अळीचा तुरळक प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत असून सदरील कीड व रोगाचे वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे. उमरगा तालुक्यातील उमरगा व मुरुम शहर वगळता तालुक्यातील इतर ग्रामीण क्षेत्रात अत्यंत कमी प्रमाणात कृषी सेवा केंद्रे असून आवश्यक असणारी औषधे तेथे मिळत नाहीत. त्यामुळे उमरगा व मुरुम शहरातील कृषी सेवा केंद्रे दि. 01 ऑगस्ट 2020 पर्यंत बंद राहिल्यास किड व रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन पिकाचे

Scanned by CamScanner

मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याअनुषंगाने उमरगा व मुरुम शहरातील कृषी सेवा केंद्रे संचारबंदीच्या कालावधीत ठराविक वेळेत चालू ठेवणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 7 चे या कार्यालयाचे आदेशान्वये प्रधानमंत्री पिक विमा योजना सन 2020-21 या योजनेत खरीप हंगामाकरिता सहभागाची अंतिम मुदत 31 जुलै 2020 पर्यंत असल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रे 24 × 7 चालू ठेवणेस परवानगी देण्यात आली असून बँकांचे कामकाजही चालू राहणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद दिनांक 25/07/2020 च्या 00.00 वाजेपासुन ते 01/08/2020 च्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व मुरुम नगर पालिका क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या कालावधीत खालील नमूद आस्थापना चालू राहतील असे आदेशित करीत आहे.

1) बी बियाणे व खते, किटकनाशके या कृषि निविष्ठांची विक्री करणारी दुकाने/आस्थापना, बिज प्रक्रिया केंद्र, त्यानुषंगीक बियाणे पॅकींग, हाताळणी केंद्र, बीज परिक्षण प्रयोगशाळा, कृषी यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग (त्याच्या पुरवठा साखळीसह) व त्यांच्या दुरुस्तीची दुकाने सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत चालु राहतील.
2) पिकविमा व अंतर्गत कामकाजाकरिता सर्व बँका सकाळी 10 ते दुपारी 4 या वेळेत सुरु राहतील.

सदरील आदेशाची कडक अमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांनी करावी. कुठल्याही व्यक्तींकडुन या आदेशातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच अन्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद.
6. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER उमरगा.
8. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER उमरगा.
9. मुख्याधिकारी नगर परिषद उमरगा, मुरुम जि. उस्मानाबाद.
10. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

27/7/20

जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner